“ना-देय प्रमाणपत्र” व “ना-विभागीय चौकशी” प्रमाणपत्रासंदर्भात

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग
**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०२५/प्र.क्र.५७/सेवा-४**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १८.१२.२०२५.

**वाचा :** १) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : सेनिवे-२०१२/प्र.क्र.८९/सेवा-४, दि.१६.०२.२०13.

२) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२५/प्र.क्र.३२/२५/कोषा.प्रशा.५, दि.२५.०७.२०२५.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील परिशिष्ट-५ मध्ये सेवानिवृत्तीविषयक प्रस्ताव सादर करण्याबाबत नमुना-७ विहित करण्यात आला आहे. सदर नमुन्यामध्ये सेवानिवृत्त कर्मचाऱ्याच्यासंदर्भात त्यांच्याकडून शासकीय येणे आहे किंवा कसे त्याचबरोबर त्यांच्याविरुध्द विभागीय किंवा न्यायिक कार्यवाही सुरु आहे किंवा कसे याची खात्री करुन कार्यालय प्रमुखाने प्रस्तुत नमुन्यामध्ये उचित माहिती भरावी लागते. सबब कार्यालय प्रमुखाकडून सदर माहिती कर्मचाऱ्याच्या सेवा कालावधीतील पूर्वीच्या सर्व कार्यालयाकडून माहिती मागविण्यात येते. यामध्ये “ना-देय प्रमाणपत्र व ना-विभागीय चौकशी प्रमाणपत्र” यांचा समावेश असतो. वस्तुत: अशा प्रकारे प्रमाणपत्र घेण्याची कोणतीही तरतूद महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मध्ये नाही. विशेषत: विभागीय चौकशी संदर्भातील माहिती पूर्वीच्या कार्यालयाकडून मागविताना सोबत “ना-देय प्रमाणपत्र” मागविण्याचीही प्रथा सुरु झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर माहिती वेळेवर प्राप्त होत नसल्याच्या कारणास्तव या माहितीअभावी सेवानिवृत्तीचा परिपूर्ण प्रस्ताव महालेखापाल कार्यालयाकडे विहित वेळेत पाठविला जात नाही. या माहितीची प्रतिक्षा करण्यामध्ये वेळ लागत असल्याने प्रस्ताव पाठविण्यास विलंब होतो. त्यामुळे संबंधित सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्तिवेतनादी लाभ उशिराने प्राप्त होतात. सेवानिवृत्त कर्मचाऱ्याची उपजिविका निवृत्तिवेतनावर असल्याने कर्मचाऱ्याच्या कुटुंबाची आर्थिक कुचंबना होते. शासन सेवेत इतकी वर्ष सेवा केल्यानंतर यासंदर्भाने मिळणारी वागणूक ही असंवेदनाशील दृष्टीकोन दर्शविते हे ठळकपणे निदर्शनास आले आहे. त्यावर उपाययोजना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून, त्यानुषंगाने पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

**शासन परिपत्रक**

वरील संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये अंतिम वेतन प्रमाणपत्राच्या कार्यपध्दतीत सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार यापुढे सदर शासन निर्णयामधील सूचनांचे काटेकोरपणे पालन केल्यास “ना-विभागीय चौकशी प्रमाणपत्र” व “ना-देय प्रमाणपत्र” स्वतंत्ररित्या मागविण्याची आवश्यकता राहणार नाही. तथापि, त्यानुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम १३२ व परिशिष्ट पाच मध्ये नमूद नमुना-७ मधील विभागीय चौकशीच्या अनुषंगाने अपेक्षित असलेल्या माहितीसंदर्भात पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे -

१) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम १३२ मध्ये नमूद शासकीय निवासस्थानासंदर्भातील शिल्लक लायसन्स फीच्या वसुली संबंधातील माहिती कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून ठराविक तारखेपूर्वी न मिळाल्यास, शासकीय निवासस्थान मिळालेल्या शासकीय कर्मचाऱ्याकडून त्याच्या सेवानिवृत्तीपूर्वीच्या आठ महिन्यांच्या कालावधीबाबत वसुली योग्य कोणतीही लायसन्स फी येणे नाही असे गृहीत धरण्यात येईल अशी तरतूद असल्याने या माहितीची प्रतीक्षा न करता सेवानिवृत्ती प्रकरण पाठविणे शक्य असल्याने याची नोंद सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुखानी घ्यावी.

तथापि, सेवानिवृत्तीनंतरही शासकीय निवासस्थानाचा ताबा शासकीय कर्मचाऱ्याकडे असल्यास त्यानुषंगाने उपदानाची रक्कम रोखून ठेवण्यासंदर्भात वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी.

२) (१) वरीलप्रमाणे शासकीय निवासस्थानाशी संबंधित असलेल्या येणे रकमांव्यतिरिक्त इतर रकमांपैकी घरबांधणी अग्रिम किंवा वाहन अग्रिम यांची वसुली वेतनातून होते असल्याने तसेच त्यासंदर्भातील आदेशाची नोंद सेवापुस्तकात असल्याने त्याची माहिती विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुखास त्यांच्याच कार्यालयातून उपलब्ध होऊ शकते.

(२) इतर अग्रिमांमध्ये उत्सव अग्रिम, संगणक अग्रिम आणि प्रवास अग्रिम यांचा समावेश असतो. ही माहितीदेखील संबंधित कार्यालयात सहज उपलब्ध असते.

(३) वेतन व भत्ते व रजा वेतनासंदर्भात असे नमूद करण्यात येते की, ज्या कार्यालयातून वेतन अदा केले जाते, त्याच कार्यालयातून वेतन व भत्त्यासंदर्भातील थकबाकीची रक्कम अदा केली जाते. तसेच रजा वेतनही अदा केले जाते. त्यामुळे पूर्वीच्या कार्यालयाकडून उक्त माहिती घेण्याचे प्रयोजन राहत नाही.

(४) आयकराची वजाती ही देखील संबंधित कार्यालयातून होत असल्याने त्याची माहितीही संबंधित कार्यालयात उपलब्ध असते. थोडक्यात वरील सर्व माहितीसाठी अन्य कार्यालयाकडून “ना-देय प्रमाणपत्र” मागविण्याचे प्रयोजन राहत नाही. तरी सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुखास असे सूचित करण्यात येते की, यापुढे सेवानिवृत्त प्रकरण सादर करण्यासाठी इतर कार्यालयाकडून “ना-देय प्रमाणपत्र” मागविण्याची प्रथा बंद करण्यात यावी व संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयातील ना-देय प्रमाणपत्राबाबतची तरतूद विचारात घ्यावी.

३) “ना-विभागीय चौकशी प्रमाणपत्र” संदर्भात संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयामध्ये दिलेल्या सूचनेनुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. ज्या कार्यालयामध्ये संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी किंवा न्यायिक कार्यवाही सुरु आहे. त्याची माहिती कर्मचारी सध्या ज्या कार्यालयात कार्यरत आहे त्या कार्यालयास प्रत्यक्षात कार्यवाही सुरु झाल्यापासून तीन महिन्याच्या आत कळविणे आवश्यक राहील.

परंतु संबंधित कर्मचारी येत्या सहा महिन्यात सेवानिवृत्त होणार असेल तर वरील माहिती तात्काळ म्हणजेच एक आठवडयात कळवावी.

४) वरीलप्रमाणे विभागीय चौकशी अथवा न्यायिक कार्यवाहीबाबत कोणतीही माहिती संबंधित कर्मचाऱ्यांविरुध्द विहित कालावधीत प्राप्त झाली नाही तर त्याच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी अथवा न्यायिक कार्यवाही प्रलंबित नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात यावी. तसेच वरील कालावधीमध्ये विभागीय चौकशी अथवा न्यायिक कार्यवाही संदर्भातील माहिती पाठविण्यात आली नाही, परिणामी सेवानिवृत्ती प्रस्ताव सादर झाला आहे ही बाब निदर्शनास आल्यास माहिती वेळेवर न देणाऱ्या संबंधित विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुखाविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

यासंबंधात सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुखांना असे निदेश देण्यात येत आहे की, त्यांनी निवृत्तिवेतनाची कार्यपध्दती करण्यासाठी विहित केलेल्या कार्यपध्दतीचे व वेळापत्रकाचे प्रत्यक्ष पालन होत आहे याची दक्षता घ्यावी आणि निवृत्तिवेतनाचे कागदपत्रे विहित नमुन्यात सर्व बाबतीत यथोचितरित्या पूर्ण करुन शासकीय कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीच्या तारखेच्या सहा महिने अगोदर महालेखापाल कार्यालयाकडे पाठविले जातील याची काळजी घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५१२१८१४२२२०५६०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MANISHA YUVRAJ KAMTE

Digitally signed by MANISHA YUVRAJ KAMTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=A7F08DB3910ECF0F88C442FBDE20F7B84E70DFD0BF4DCD977ABAB75B3FCB8508, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=11602E78DA072F96AF0EDE7966315FA5B93A2119E4A490D340E527F96DBA01D3, cn=MANISHA YUVRAJ KAMTE
Date: 2025.12.18 14:23:49 +05'30'

**(मनिषा यु. कामटे)**
**शासनाचे उप सचिव**

**प्रति,**

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
४) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
६) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
७) संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) मुख्य लेखा परीक्षा, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई.
९) उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/ अमरावती.
१०) वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे / नागपूर / औरंगाबाद / नाशिक.
११) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१३) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा / विधानपरिषद.
१४) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
१५) राज्यपालांचे सचिव.

१६) मुख्यमंत्र्यांचे सचिव.
१७) सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव.
१८) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई.
१९) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
२०) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
२१) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२२) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
२३) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई / नागपूर / औरंगाबाद.
२४) मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
२५) आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व).
२६) सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ ला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
२७) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२८) सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डींग), पोट माळा, वांद्रे, मुंबई - ४०० ०५१.
२९) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
३०) कार्याध्यक्ष, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन, १४४९, सदाशिव पेठ, संकल्प खजिना महाल बोळ, एस.पी.कॉलेजसमोर, पुणे ४११ ०३०.
३१) अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट गव्हर्नमेंट पेंशनर्स असोसिएशन, बेळगांव.
३२) मंत्रालयातील सर्व विभाग.
३३) सर्व विभागीय आयुक्त.
३४) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
३५) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.
३६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
३७) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३८) तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३९) सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण).
४०) संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई.
४१) सर्व विभागीय शिक्षण उप संचालक.
४२) सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक.
४३) कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठे, राहुरी, जिल्हा अहमदनगर.
४४) कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
४५) कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला.
४६) कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
४७) कुल सचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेर, जिल्हा रायगड.
४८) कुल सचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.
४९) बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई - ४०० ००१.
५०) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२०.
५१) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई - ४०० ००४.
५२) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई - ४०० ०१३.
५३) इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
५४) नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
५५) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई - ४०० ०२८.
५६) निवड नस्ती.